अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 20 नोव्हेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 14 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# नगर परिषद निवडणूकीत १०४ विधीग्राह्य नामांकन

## ०४ उमेदवार नगराध्यक्ष व १०० नगरसेवक पदाकरीता रिंगणात

ब्रह्मपुरी/महेश पिलारे

ब्रह्मपुरी नगर पालिका सार्वत्रिक निवडणूकीकरीता नगराध्यक्ष पदाकरीता ०५ तर नगरसेवक पदासाठी १०५ नामांकन दाखल झाले होते. छाननीनंतर नगराध्यक्ष पदाचे ०४ तर नगरसेवक पदाचे १०० विधीग्राह्य नामनिर्दिष्ठ उमेदवारांची यादी निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रसिद्ध केली.बहुपक्षीय लढत असल्याने फक्त शहरच नव्हे तर संपूर्ण तालुक्याचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे. नगरसेवकांपासून नगराध्यक्ष पदापर्यंत अनेक दिग्गज आणि नवोदित उमेदवारांनी मैदानात उडी


योगेश मिसार
(काँग्रेस)


सुयोग बाळबुध्दे
(भाजपा)


मिलिंद भनारे
(उबाठा)
तिसरी आघाडी

घेतल्याने ब्रह्मपुरीतील निवडणूक रंगतदार होणार हे स्पष्ट झाले आहे.

नामांकन दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर होती. विविध पक्षांच्या ०४ उमेदवारांनी नगराध्यक्ष पदाकरीता नामांकन अर्ज दाखल केले आहे. काँग्रेसकडून नगराध्यक्ष पदासाठी योगेश मिसार यांनी अर्ज दाखल करताना काँग्रेसचा जनाधार एकवटण्यास सुरुवात झाली आहे. दुसरीकडे भाजपाकडून प्रा. सुयोग बाळबुद्धे यांनी शेवटच्या क्षणी अर्ज दाखल करून राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल घडवून आणला आहे. दोन्ही पक्षांचे बलाढ्य उमेदवार समोरासमोर येत असल्याने शहरातील निवडणूकीचे वातावरण अधिकच चुरशीचे झाले आहे. सोबतच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद भणारे व बहुजन समाज पक्षाच्या वतीने निहाल ढोरे यांनी नामांकन दाखल केला आहे.

**प्रभाग क्रमांक : १** (अ) ०४ (ब)०६, **प्रभाग क्रमांक : २** (अ) ०३, (ब) ०८, **प्रभाग क्रमांक : ३** (अ)०४, (ब) ०३, **प्रभाग क्रमांक : ४** (अ) ०७, (ब)०४ , **प्रभाग क्रमांक : ५** (अ) ०३, (ब)०३ , **प्रभाग क्रमांक : ६** (अ) ०४, (ब)०५, **प्रभाग क्रमांक : ७** (अ)०६, (ब)०८, **प्रभाग क्रमांक : ८** (अ) ०६, (ब) ०५, **प्रभाग क्रमांक : ९** (अ)०२, (ब) ०३, **प्रभाग क्रमांक : १०** (अ) ०३, (ब)०५, **प्रभाग क्रमांक : ११** (अ)०२, (ब) ०२, (क) ०५

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# भाजपच्या गोटात नाट्यमय घडामोडी

ब्रह्मपुरी/का.प्र.

भाजपा गोटात काथ्याकूट व नाट्यमय घडामोडीनंतर प्रा.सुयोग बाळबुद्धे यांच्या गळयात नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीची माळ पडली. नामांकन अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी दुपारी ०१ वाजता बाळबुद्धे यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली.

नगर परिषद निवडणूकीत उमेदवारीची निवडीवरून भाजपाचे माजी आमदार अतुल देशकर व चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटीभाऊ भांगडीया यांच्यातील राजकीय स्पर्धा उघडकीस आली. आमदार भांगडीया हे नुकतेच काँग्रेसमधून भाजपात प्रवेशित झालेले विलास विखार यांच्या उमेदवारीसाठी अत्यंत आग्रही होते. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील विखार यांची बाजू उचलून धरली होती. त्यामुळे विखार यांनाच उमेदवारी मिळणार हे जवळ-जवळ निश्चीत मानण्यात येत होते. फक्त औपचारिक घोषणा व्हायची होती.

मात्र, शहरातील निष्ठावंत कार्यकर्ते मात्र विलास विखार यांच्या विरोधात ठामपणे उभे होते. नवागताला पक्षाची तिकीट दिल्यास, निष्ठावंत नेते व कार्यकर्ते बंडखोरीच्या तयारीत होते. बंडाची भाषा वापरून त्यांनी अप्रत्यक्षपणे भाजपा श्रेष्ठींना आव्हान दिले होते. माजी आमदार अतुल देशकर यांनी सुद्धा विखारच्या विरोधात दंड थोपटले होते. देशकर यांनी प्रा. सुयोग बाळबुद्धे, अरविंद नंदूरकर व मनोज भूपाल यांच्यापैकी एकाला नगराध्यक्ष पदाची उमेदवारी द्यावी,

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# RBS इथेनॉल प्लांटमध्ये भीषण आग

## कोणतीही जिवीतहानी नाही



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी-बोरगांव मार्गावर स्थित RBS Renewable Pvt. Ltd. कंपनीच्या इथेनॉल प्लांटमध्ये काल बुधवारला सायंकाळी ५ वाजताचे दरम्यान अचानकपणे आग लागून प्रचंड स्फोट झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. आग इतकी भयंकर होती की, धूराचे लोट व आगीचे डोंब दूरूनही दिसून येत होते. आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी विविध ठिकाणांहून अग्नीशामक दलाला पाचारण करण्यात आले. रात्री ८ चे दरम्यान आग आटोक्यात आली. आगीचे कारण अद्यापही समोर आले नाही.

ब्रम्हपुरी शहरापासून अंदाजे २-३ किमी अंतरावर बोरगांव रोडवर इथेनॉल प्लांट स्थित आहे. प्राप्त माहितीनुसार, येथे १.२५ लाख लीटर इथेनॉलचा साठा होता. अचानक आग लागल्यामुळे भयंकर स्फोट झाला. यामुळे सभोवतालच्या गावांना हादरे बसल्याचे समजते.

घटनास्थळी ब्रम्हपुरी, नागभीड, वडसा, सिंदेवाही, चिमूर, आरमोरी येथील अग्निशामक वाहने व चंद्रपुर महानगर पालिकेचे दोन फायर

(उर्वरित पान क्र. ६ वर)




अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

## संपादकीय...

# निवडणुकांचा मतसंग्राम!

गेल्या अनेक महिन्यांपासून ज्या निवडणूक कार्यक्रमाची प्रतीक्षा राज्यातील मतदारांना लागून राहिली होती, त्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, २ डिसेंबर रोजी महाराष्ट्रभरात नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी केली जाईल. ३ डिसेंबर रोजी या निवडणुकांचे निकाल जाहीर केले जातील. आता बिहार विधानसभा निवडणूक संपल्यानंतर महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १० नोव्हेंबर पासून अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर रोजी संपली आहे. अर्जाची छाननी १८ नोव्हेंबरला पार पडली. यात ब्रम्हपुरी नगर परिषदेकरीता नगराध्यक्ष पदाकरीता ५ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. यात योगेश मिसार, मिलिंद भनारे, सुयोग बाळबुध्दे, निहाल ढोरे व अरविंद नंदुरकर यांचा समावेश होता. त्यातील १ उमेदवाराचा नामांकन अर्ज बाद करण्यात आला. अरविंद नंदुरकर यांचा 'एबी' फॉर्म जोडलेला नसल्यामुळे अर्ज बाद करण्यात आला. तर नगरसेवक पदाकरीता १०५ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. यातील ५ उमेदवारांचे अर्ज बाद करण्यात आले. यामध्ये प्रभाग ११ मधील माधुरी उपासे व रंजना बुराडे यांचेसह प्रभाग ११ क मधील सुरज ठवरे, प्रभाग १० ब मधील छाया वानखेडे व ८ अ मधील भारती जांभूळकर यांचा समावेश आहे.

अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत २१ नोव्हेंबरपर्यन्त असणार आहे. आक्षेप असलेल्या ठिकाणी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत २५ नोव्हेंबर रोजी असणार आहे. उमेदवारांना निवडणूक चिन्ह व उमेदवारांची अंतिम यादी २६ नोव्हेंबर रोजी मिळणार आहे. म्हणजे उमेदवारांना त्यांना मिळालेल्या चिन्हांचा प्रचार करण्यास सहा दिवस मिळणार आहे. एवढ्या कमी कालावधीत उमेदवार मतदारांपर्यंत पोहोचणार कसे हा प्रश्नच आहे. कारण नगरपालिकांसाठी मतदानाची तारीख २ डिसेंबर २०२५ आहे. मतमोजणी ३ डिसेंबर होणार असून त्याचदिवशी निकाल जाहीर केला जाणार आहे.

राज्य निवडणूक कार्यक्रमांतर्गत राज्यातील २४६ नगर परिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेतल्या जाणार आहेत. यामधून ६,८४९ सदस्यांची व २८८ अध्यक्षांची निवड होणार आहे. यंदा १० नव्या नगर परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. तर, २३६ नगर परिषदांची मुदत संपली आहे. तसेच राज्यातील ४७ पैकी पाच नगर पंचायतींची मुदत अद्याप संपलेली नाही. तर उर्वरित ४२ नगरपंचायतींची निवडणूक होणार आहे. यापैकी २७ नगर पंचायतींची मुदत संपली असून १५ नव्या नगरपंचायतींची यंदा भर पडली आहे. नगरपंचायत व नगरपरिषद निवडणूक एकूण जागा आणि आरक्षित जागा निवडणूक होत असलेल्या २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. एकूण प्रभाग ३८२० आहेत. एकूण जागा ६८५९ आहेत. यामध्ये ३४९२ महिलांसाठी जागा असून ८९५ जागा अनुसूचित जातींसाठी तर ३३८ जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. १८२१ जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी राखीव आहेत.

मतदारांच्या मदतीसाठी निवडणूक आयोगाचे मोबाईल ॲप विकसित केले आहे, मतदारांसाठी राज्य निवडणूक आयोगाने संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यातील सर्च सुविधेमार्फत मतदारांना त्यांचे नाव व मतदान केंद्र शोधता येईल असे निवडणूक आयुक्तांनी सांगितले. पाहुया, येत्या ०३ डिसेंबरला कोणत्या उमेवारांना मतदारांची पसंती मिळते व कोण ब्रम्हपुरी नगराध्यक्ष पदी विराजमान होतोय...

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाचे विभागीय हॉकी स्पर्धेत सुयश



ब्रम्हपुरी/का.प्र.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीयस्तरीय हॉकी क्रीडा स्पर्धा पोलीस कवायत मैदान, भंडारा येथे १९ वर्षा खालील मुलांच्या हॉकी स्पर्धेमध्ये नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरीचे हॅण्डबॉल संघ विजेता ठरलेला आहे.

मुलांच्या संघातील विश्वास मामीडवार (कर्णधार), वेदांत भागडकर, गुलचंद करकाडे, प्रेम तुपट, अर्णव चंदनखेडे, सतीश दिघोरे, शैलेश मेश्राम, लक्ष्मीकुमार कुर्झेकर, राधेश्याम भानारकर, मोहित नान्हे, कुणाल ठेंगरे, कमालकिशोर साहारे या सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट असे खेळाचे प्रदर्शन केले. या यशामुळे सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत नागपूर विभागाचे नेतृत्व करण्याचा मान नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरीला मिळाला आहे.

सर्व खेळाडूंना संस्थेचे सचिव मा. अशोकजी भैया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर, डॉ. एम. ए. शेख क्रीडा समिती अध्यक्ष, डॉ. के. एम. शर्मा, प्रा. आनंद भोयर पर्यवेक्षक कनिष्ठ महाविद्यालय, संजू मेश्राम महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, क्रीडा समिती मधील सर्व सदस्य, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी शुभेच्छा दिल्या. या संपूर्ण संघाला व्यवस्थापक म्हणून संजू मेश्राम सर ,तर प्रशिक्षक म्हणून प्रदीप ठेंगरी, साहिल मेश्राम यांनी मार्गदर्शन केले.

# नीता कोंतमवार स्मृतीप्रित्यर्थ कविसंमेलनाचे आयोजन

## डॉ. धनराज खानोरकर संमेलनाध्यक्ष पद भूषविणार

ब्रह्मपुरी/का.प्र.

सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंच, चंद्रपूरद्वारे आयोजित कवयित्री,लेखिका नीता कोंतमवार स्मृतिप्रित्यर्थ कविसंमेलनाचे आयोजन बल्लालपूर येथील कला, वाणिज्य महाविद्यालयात रविवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ ला सकाळी ११.०० वा. करण्यात आले आहे.

या कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी ब्रह्मपुरी येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रसिद्ध कवी, लेखक, पत्रकार आणि ३३ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष, बहुचर्चित 'संजोरी' ग्रंथाचे लेखक डॉ.धनराज खानोरकर यांची निवड करण्यात आली असून संमेलनाचे उद्घाटन सर्वसेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ अनिल शिंदे करणार आहेत. यावेळी विशेष अतिथी म्हणून प्राचार्य डॉ रविंद्र केवट आणि प्रमुख अतिथी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ मनिषकुमार



कायरकर, गडचिरोली जिल्हा झाडीबोली साहित्य मंडळाचे अध्यक्ष प्रा विनायक धानोरकर, माजी नगरसेवक संजय वैद्य उपस्थित राहतील.

या कविसंमेलनाचे संचालन मंचाचे उपाध्यक्ष कवयित्री सीमा भसारकर करणार असून जवळपास ६० कवी आपल्या रचना सादर करणार आहेत. या कविसंमेलनाला जास्तीत जास्त कविंनी आणि रसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मंचाचे अध्यक्ष कवी इरफान शेख, सचिव कवी प्रदीप देशमुख, कवयित्री गीता रायपूरे, गझलकार सुनिल बावणे व इतर सदस्यांनी केले आहे.

ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

## विनोदिनी

राजू का दो दिन पहले बुरी तरह ॲक्सिडेंट हो गया... बाद में डॉक्टर के पास जाकर इलाज किया... डॉक्टर ने उसे कुछ दवा देकर व पैर पर पट्टी बांधकर दी...

आज उसके घर उसके रिश्तेदार अचानक से आ गए...

राजू के पैर की पट्टी देखकर रिश्तेदार ने कहा...

रिश्तेदार : अरे बेटा, ये पैर में पट्टी क्यों बाँध रखी है? क्या हुआ...??

राजू : कुछ नहीं अंकल, बाईक से गिर गया... चोट लग गई..

रिश्तेदार : ओहो बेटा..! दवा-दारू ले ली न..?

राजू : हाँ अंकल... दारू गिरने से पहले ली थी, और दवा गिरने के बाद...!!

# ब्रम्हपुरी नगर परिषद निवडणूक रिंगणात उभे असलेले उमेदवार

योगेश मिसार

सुयोग बाळबुध्दे




मिलिंद भनारे

निहाल ढोरे

| प्रभाग क्र. | गट | काँग्रेस | भाजपा | तिसरी आघाडी | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|
| प्रभाग १ | (अ) | काजल तलमले | यामिना बठे | ------------- | प्रियंका साखरकर (अपक्ष), सपना सुभाष खेत्रे (अपक्ष) |
| | (ब) | चंद्रकांत बावनकुळे | नितेश आंबोरकर | हरिश्चंद्र सहारे | दिनेश मुंडले (अपक्ष), कालिचरण बगमारे (अपक्ष), नोगेश बगमारे (एनसीपी) |
| प्रभाग २ | (अ) | बबीता आमले | अर्चना उइके | ------------- | उज्ज्वला मगरे (एनसीपी), |
| | (ब) | प्रकाश खोब्रागडे | रितेश दशमवार | राहुल भोयर | सुरज माकडे (शिवसेना), श्रीधर टोंगे (अपक्ष), आशिषकुमार सोंडवले (बसपा), दिनकर शुक्ला (आप), एकनाथ विखार (अपक्ष) |
| प्रभाग ३ | (अ) | मनोज कावळे | राहुल करंबे | सहदेव भानारकर | आकाश शेंद्रे (शिवसेना) |
| | (ब) | रेणुताई ठेंगरी | प्रतिभा मैंद | मीनल गजभिये | -------------- |
| प्रभाग ४ | (अ) | अनुकुल शेन्डे | प्रकाश लोखंडे | विजय रामटेके | अशोक रामटेके (आरपीआय ए), प्रेमलाल मेश्राम (वंचित), विवेक मेश्राम (अपक्ष) |
| | (ब) | जयश्री कुथे | रश्मी पेशने | ॲड. हेमलता नाकतोडे | शिवानी सेठिया (आरपीआय ए) |
| प्रभाग ५ | (अ) | सतिश हुमने | अंकज कानझोडे | महेश जनबंधु | -------------- |
| | (ब) | रंजना पिसे | चेतना येवले | ------------- | रश्मी रापेल्लिवार (शिवसेना) |
| प्रभाग ६ | (अ) | हेमलता सिंहगडे | रुपाली रावेकर | ------------- | ममता मालाधरे (अपक्ष), मनिषा नागपूरे (एनसीपी) |
| | (ब) | जगदिश पिलारे | राकेश वेलथरे | विजय रामटेके | सुनिल कुंभारे (अपक्ष), निहाल ढोरे (बसपा) |
| प्रभाग ७ | (अ) | गीता मेश्राम | सूर्यकांता गेडाम | प्रतिमा कोसे | माला माटे (वंचित), अंकिता शेन्डे (बसपा), प्रिताई मेश्राम (शिवसेना) |
| | (ब) | सचिन राऊत | अमित रोकडे | रवी चहांदे | प्रतिक घाटोळे (अपक्ष), नरेंद्र नरड (शिवसेना), अमोल भानारकर (अपक्ष), चंद्रशेखर मेश्राम (बसपा), आकाश राऊत (आरपीआय ए) |
| प्रभाग ८ | (अ) | पुष्पलता पोपटे, | दर्शना अंडेलकर | ------------- | केश्विनी गोंडाने (अपक्ष), अर्चना धोंगडे (एनसीपी), करूणा बोदेले (आरपीआय ए) |
| | (ब) | नितीन उराडे | मनोज वठे | ------------- | महेंद्र मातेरे (एनसीपी), चंद्रभान कुंभरे (अपक्ष), बालु बोरकर (अपक्ष) |
| प्रभाग ९ | (अ) | अनिल दोनाडकर | मनोज भुपाल | ------------- | -------------- |
| | (ब) | सपना बल्लारपूरे | भावना येरावार | ------------- | सरिता भैरव (शिवसेना) |
| प्रभाग १० | (अ) | राकेश पडोळे | स्वप्नील अलगदेवे | ------------- | सुशिल थारकर (शिवसेना) |
| | (ब) | ज्योती राऊत | दक्षाबेन पटेल | ------------- | भावना तुमाने (शिवसेना), मैथिली ताम्हण (अपक्ष), छाया वानखेडे (अपक्ष) |
| प्रभाग ११ | (अ) | माधुरी उपासे | नंदा उरकुडे | ----------- | -------------- |
| | (ब) | रंजना बुराडे | अंजली उरकुडे | | -------------- |
| | (क) | सारंग बनपुरकर | हार्दिक रत्नपारखी | रक्षीत नंदराज रामटेके | अविनाश राऊत (एनसीपी), प्रशांत बांबोळे (बीएसपी) |

# लाडक्या बहिणींच्या केवायसीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

## पती किंवा वडील हयात नसलेल्यांनाही दिलासादायक सूचना

ब्रम्हपुरी/का.प्र.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील महिलांची ई-केवायसी (Ladki Bahin E-KYC) प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर सुरू असताना, अलिकडे काही जिल्ह्यांमध्ये उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्ती, महिलांनी उपस्थित केलेल्या अडचणी लक्षात घेता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली ई-केवायसी करण्याची दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत निर्धारित अंतिम सुदत वाढवून आता ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी



दिली.

अलीकडील नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच काही महिलांच्या पती किंवा वडिलांचे निधन झाल्यामुळे संबंधित आधार क्रमांकावर ओटीपी प्राप्त होणे अशक्य झाले आहे. अशा परिस्थितीत अपूर्ण ई-केवायसी प्रक्रियेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच, ज्या पात्र महिलांच्या पती किंवा वडील हयात नाहीत किंवा ज्या महिला घटस्फोटित आहेत अशांनी स्वत:ची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून संबंधित मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोट प्रमाणपत्र किंवा माननीय न्यायालयाचा आदेश यांची सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहील. या अनुषंगाने पात्र महिलांना न्याय मिळावा आणि कोणतीही पात्र महिला तांत्रिक किंवा अपरिहार्य कारणांमुळे योजनेपासून वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे.

याकरिता माननीय मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या हिताचे भान राखत ई-केवायसी प्रक्रियेस ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच विस्तारित कालावधीत लाभार्थीनी आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहनही मंत्री तटकरे यांनी केले आहे.

❁❁❁❁❁❁


- जाहिरात -

**संत श्रावणबाबा नागरी सहकारी पत संस्था मर्या. ब्रम्हपुरी**

र.नं. १०२४

**पदभरती करणेबाबत**

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | व्यवस्थापक | १ |
| २. | लिपिक | १ |

इच्छुक उमेदवारांनी दि. ३०/११/२०२५ रोज रविवारला संस्थेचे कार्यालय बसस्टँड समोर कारवट कॉम्प्लेस ब्रम्हपुरी येथे ठिक ११.०० वाजता आपल्या डॉक्युमेंटसह उपस्थित रहावे.

अटी :

(१) संगणकिय ज्ञान असावे. (२) G.D.C.A. असलेल्या व्यक्तिस प्राधान्य

(३) कोणत्याही शाखेचा पदविधर आवश्यक (४) अनुभवास प्राधान्य

संपर्क ९७६७०५२३६५

अध्यक्ष

संत श्रावणबाबा नागरी सह. पत संस्था मर्या. ब्रम्हपुरी


# डोळ्यांच्या मोफत शस्त्रक्रियेसाठी तिसरी बस रवाना

ब्रह्मपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टीच्या तालुक्यातील हळदा, मूडझा, आवळगाव येथे 'भाजपा



युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांच्या संकल्पनेतून नमो नेत्र चिकित्सा शिबिर' आयोजित करण्यात आले होते. यामध्ये डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी पात्र असलेल्या व्यक्तींची मोफत शस्त्रक्रिया करून देण्यात येणार आहे. या शस्त्रक्रियेसाठी या परिसरातील रुग्णांची तिसरी बस नागपूर येथे रवाना करण्यात आली.


मागील काही दिवसांपासून सातत्याने या शिबिरांमध्ये नेत्र शस्त्रक्रियेसाठी पात्र असलेल्या रुग्णांना टप्प्या टप्प्यांने शस्त्राक्रियेसाठी पाठविण्यात आले आहे. तनय देशकर यांच्या या विधायक कार्यामुळे परिसरातील जनतेच्या वतीने त्यांच्या कामाप्रती समाधान व्यक्त करण्यात येत आहे. आता पर्यंत ७० रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली असून आगामी काळात उर्वरीत नागरिकांची मोफत शस्त्रक्रिया करून देणार असल्याची माहिती तनय देशकर यांनी दिली आहे.

ज्या नेत्र शस्त्रक्रियेसाठी हजारो रुपयांचा खर्च येतो त्या शस्त्राक्रिया मोफत होत असल्यामुळे परिसरातील सर्वसामान्य जनतेला याचा मोठा दिलासा मिळतो आहे. मूडझा येथे बस चे पूजन करून रुग्णांची तिसरी बस नागपूर येथील महात्मे हॉस्पिटल येथे रवाना करण्यात आली आहे. या प्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर, माजी सरपंच घनश्यामजी टोमटी, नानाजी झरकर, भाजयुमो तालुकाध्यक्ष अविनाश मस्के, उपसरपंच लोमेष राऊत, बूथ प्रमुख मोतीराम मेश्राम, बूथ प्रमुख हरिदास दिवटे, ग्रा.पं सदस्य बंडू कोटगले, विलास डोंबळे, मुखरू चापले, धनराज लोणारे , शंकर आष्टेकर, राजेंद्र राऊत, धीरज पाल, प्रफुल सातपुते उपस्थित होते.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये 'ब्लूमिंग बड परेड'चे आयोजन

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे प्रि-स्कूल विभागातील विद्यार्थ्यांकरिता Blooming Bud Parade Activity चे आयोजन बुधवार दि. १२ नोव्हेंबर २०२५ ला करण्यात आले.











एल. एम. बी. पब्लिक स्कूल ही विद्यार्थ्यांच्या कला गुणांना व कौशल्यांना उत्तेजना मिळावी. म्हणून नवनवीन उपक्रमांचे आयोजन करित असते. Blooming Bud या गतिविधिच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वेशभूषा धारण करून त्याचे महत्व आणि गुणकारी फायदे याची माहिती स्टोरी द्वारे मुलांना सांगण्यात आले. प्रि-स्कुल विभागातील विद्यार्थ्यांनी फूलपाखरू, सुर्यफूल, मधमाशी, परी, झाड, कमळाच फूल, गुलाबाचे फूल इत्यादी प्रकारच्या वेशभूषा साकार करून त्यांचे गुणधर्म व फायदे सांगितले. त्यामध्ये झाडे आपल्यासाठी किती फायदेमंद आहे हे सागंण्यात आले.

Blooming Bud Parade Activity च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निरनिराळ्या Blooming Bud विषयी माहिती मिळाली व त्यापासून आपल्याला कोणते फायदे मिळतात याची सुद्धा जाणीव निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्टपणे Blooming Bud Parade Activity सादर केली. सर्व प्रि-स्कूल च्या शिक्षिका यांच्यामुळे ही Activity यशस्विरित्या पार पडली.

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात बिरसा मुंडा जयंती

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात भगवान बिरसा मुंडा जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर व अधीक्षक संगीता ठाकरेंनी फोटोला माल्यार्पण केले.

प्रसंगी डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम, डॉ असलम शेख, डॉ धनराज खानोरकर, डॉ रतन मेश्राम, डॉ मोहन कापगते, डॉ किशोर नाकतोडे, डॉ युवराज मेश्राम, सुनिल चौधरी, डॉ अजय खाजगीवाले, डॉ योगेश ठावरी, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे, डॉ अरविंद मुंगोले, डॉ हर्षा कानफाडे, डॉ कुलजित शर्मा, डॉ मिलिंद पठाडे, डॉ वर्षा चंदनशिवे, प्रा बालाजी दमकोंडवार, प्रा निलिमा रंगारी, डॉ दर्शना उराडे, डॉ राजू आदे, प्रा दलेश परशुरामकर आदी उपस्थित होते.

# ने.हि. कन्या विद्यालयाच्या 'यशोदा'ची गरुड भरारी

## राज्यस्तरीय हॅमर थ्रो स्पर्धेत कांस्य पदकावर नाव कोरले



ब्रम्हपुरी/का.प्र.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२/११/२०२५ ला एस.वी.जे. एस. सी.टी.ग्राउंड, डेरवन , जिल्हा रत्नागिरी येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत १७ वर्षा आतील मुलींच्या गटात हातोडा फेक (हॅमर थ्रो) स्पर्धेत ने.ही. कन्या विद्यालय,ब्रह्मपुरी ची विद्यार्थिनी यशोदा अजय खुळशिंगे हीने उत्कृष्ट प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावित कांस्य पदक आपल्या नावावर केले. त्याबद्दल तिचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे.

यशोदा हीने आपल्या विजयाचे श्रेय तीचे आई व वडील व चंद्रपूर जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाशजी पुंड साहेब, ने. ही.शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया साहेब, तालुका क्रीडा अधिकारी मोरेश्वर गायकवाड सर , तालुका क्रीडा संयोजक गोपालजी भानारकर सर, ने.ही. कन्या विद्यालय , ब्रम्हपुरी च्या मुख्याध्यापिका बनपुरकर मॅडम , क्रीडाशिक्षक बारेकर सर, भारती बन मॅडम , प्रशिक्षक राहुल जुआरे सर यांना दिले यशोदा ही मागील १ वर्षापासून पी.आर.डी. स्पोर्ट्स, ब्रम्हपुरी चे संचालक राहुल जुआरे यांच्या मार्गदर्शनात ब्रह्मपुरी तालुका क्रीडा संकुल येथे सराव करत आहे.

# ब्रम्हपुरी पोलीसांनी शोधले २४ हरविलेले मोबाईल

ब्रम्हपुरी/का.प्र.

CEIR Portal सायबर च्या माध्यमातून पो स्टे ब्रम्हपुरी




परिसरातील मिसिंग मोबाईलचा शोध घेण्यात आला. दरम्यान, २४ मोबाईलचा शोध लावण्यात ब्रम्हपुरी पोलीसांना यश आले. सदर मोबाईल पोलीस निरिक्षक प्रमोद बानवले यांच्या हस्ते मूळ मोबाईल धारक व्यक्तींना मोबाईल परत देण्यात आले.

सदर मोबाईलचा शोध डीबी पथकातील सपोनी मनोज खडसे, पोहवा मुकेश गजबे, पो.अ निलेश तुमसरे, पो.अ स्वप्निल पळसपगार, चंदू कुरसंगे, पो अ इरशाद खान, वशिष्ठ रंगारी यांनी केली. पोलीसांनी हरवलेल्या मोबाईलचा शोध लावून ते प्राप्त करून दिल्याबद्दल मोबाईल धारकांनी पोलीसांचे आभार मानले.

# दीडशे वर्षाची परंपरा जोपासताहेत चिखलगाववासिय

## कार्तिक पोर्णिमेनिमित्य काकड आरती व गोपालकालाचे आयोजन



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील वैनगंगेच्या काठावरील शेवटच्या टोकावर असलेल्या चिखलगाव येथे कार्तिक पौर्णिमा उत्सवाची दीडशे वर्षाची परंपरा अजूनही ग्रामवासी जोपासत आहेत. यावर्षी सुद्धा गावातील मध्यवर्ती हनुमान मंदिरात काकड आरती समाप्ती कार्तिक पौर्णिमेला गोपाळकाला कार्यक्रमाने साजरा करण्यात आला.

आदल्या दिवशी विठ्ठल रखुमाई मंदिर,काही खाजगी घरी हा उत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने घरोघरी पाहुण्यांची रेलचेल, मंडई बाजार भरतो. मुख्य कार्यक्रमात ग्रामस्थ, पाहुणे यांच्या उपस्थितीत गावातील वयस्क, तरुणमंडळी, सोबत बाल कलाकार वेगवेगळ्या झाकी व सोंग काढून महाराष्ट्रातील लोककला जपत आहेत. खऱ्या अर्थाने लोक संस्कृती व लोककला जिवंत ठेवण्याचे कार्य होत आहे.

या सर्व कार्यक्रमात तुकाराम नाकतोडे, मारोती ठेंगरे, मुखरु तलमले, दुधराम शहारे, मुरारी नाकतोडे, सहदेव शहारे, एकनाथ शहारे, पंढरी मोहिले, नवनाथ दुपारे, जयदेव तुपट, सुरेश दुपारे, दादाजी पिल्ले, मधुकर शहारे, हिवराज नाकतोडे, सुनील पिल्ले सहकार्य करतात. या दिवशी गावकरी यांच्या मनोरंजनासाठी नाटकाचे आयोजन करण्यात आले होते.

# ने.हि. महाविद्यालयाच्या एमसीव्हीसी विभागाची फ्रेश फिल लॉण्ड्री अ‍ॅण्ड ड्रायक्लिनर्सला भेट

ब्रम्हपुरी/का.प्र.

विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन MCVC अभ्यासक्रमाचे शिक्षण घेताना laundry & Dry cleaning ची सेवा देणारे Fresh Feel laundry & Dry cleaners या स्टार्टअपला नेवजाबाई हितकारणी





आपल्या ब्रम्हपुरी शहर व आजूबाजूच्या परिसरातील नवनविन व्यवसायाची माहिती व्हावी या करिता महाविद्यालयाचे वतीने सबंधित व्यवसायाला भेट दिली जाते.

दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ ला ब्रम्हपुरी शहरातील एकमेव आधुनिक मशीनद्वारे महाविद्यालय ब्रम्हपुरी च्या MCVC अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. या वेळी प्रा रोहित अरगेलवार आणि फ्रेश फिल च्या संचालिका चेतना दीपक पत्रे यांनी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना लॉन्ड्री अँड ड्राय क्लीनिंग या व्यवसायाची माहिती दिली.

# लोकमत महागेम अ‍ॅथलेटिक स्पर्धेत

## पीआडी स्पोर्ट्सच्या विद्यार्थ्यांची यशस्वी कामगिरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक १८/११/२०२५ मंगळवार ला नागपूर येथील युनिव्हर्सिटी ग्राउंड वर झालेल्या राज्यस्तरीय लोकमत अ‍ॅथलेटिक स्पर्धेत १३ वर्षा आतील मुलींच्या गटात गोळाफेक स्पर्धेत पी.आर.डी. स्पोर्ट्स, ब्रम्हपुरी ची विद्यार्थिनी गार्गी हेमकृष्ण दोनाडकर हिने उत्कृष्ट प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला तर ४०० मीटर रनिंग स्पर्धेत मानसी शेखर फटिंग हिने प्रथम क्रमांक व श्वेता विष्णू पिल्लारे हीने द्वितीय क्रमांक पटकाविला तर १५ वर्षा आतील मुलींच्या गटात गोजिरी हेमकृष्ण दोनाडकर हिने १०० मीटर रनिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला.

सर्व विजेत्या खेळाडूंनी आपल्या विजयाचे श्रेय पालक तसेच पी. आर.डी. स्पोर्ट्स ,ब्रह्मपुरीचे संचालक राहुल जुआरे यांना दिले. या उत्कृष्ट कामगिरी बद्दल सर्व विजेत्या खेळाडूंचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

**... QUOTES ...**

"You cannot change your future, but you can change your habits, and surely your habits will change your future."

- Dr. Abdul Kalam

**चारोळी**

*पहिला नातू झाला की,*
*माणूस होतो आजोबा - हर्ष भारी...*
*दुसरा नातू झाला की,*
*माणूस होतो निवाडा - अधिकारी...*

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी स्कुलमध्ये बालक दिन उत्साहात साजरा








ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील नामांकित एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांची १३३ वी जयंती बालक दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. सोबतच किसनलालजी मदनगोपालजी भैया यांची जयंतीही साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाप्रसंगी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम व प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका राठी मॅडम, शाळेच्या पर्यवेक्षिका झोडे मॅडम यांच्या हस्ते पं. नेहरूंच्या प्रतिमेला तसेच स्व. किसनलालजी भैया यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी बालक दिनाचे महत्व विशद करून पं. नेहरूंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला यावेळी शाळेतील शिक्षक राकेश सरांनी 'मुले ही देवाघरची फुले' असा संदेश चाचा नेहरूंची वेशभूषा साकारून दिला. त्याचप्रमाणे किसनलालजी भैया यांच्या वेशभूषेत मनोज सरांनी सुद्धा त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाची सुरूवात शिक्षकांच्या परिपाठाने झाली. विद्यार्थ्यांच्या मनोरंजनाकरिता खास गीत सादर केले. सोबतच काही शिक्षकांनी अप्रतिम नृत्याविष्कार सादर केले. या नृत्यांमधून बालपणीच्या आठवणी ताज्या करण्यात आल्या. आजच्या धावपळीच्या युगात प्रत्येकाचे बालपण हरवलेले दिसते. या नृत्याच्या सादरीकरणामुळे स्कुलचे वातावरण अतिशय मंत्रमुग्ध झाले. सोबतच काही शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी व उद्बोनासाठी नाटिका सादर केली व वर्गात सुद्धा शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत वेगवेगळ्या कलाकृती घेतल्या गेले.

सुत्रसंचालन स्मिता मॅडम आणि हेमलता मॅडम यांनी केली. मोठ्या उत्साहाने शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या बालपणाचे सादरीकरण केले.

## संत श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा उत्सव

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील विठ्ठल मंदीर येथे दि. १७ नोव्हेंबरला संत श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा उत्सव संपन्न करण्यात आला. या निमित्य शरयू भानारकर यांचे प्रवचन पार पडले. भगवद् गीता ही आपल्या जीवनात नित्य उपयोगी आहे. ती संस्कृत भाषेत असल्यामुळे ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेत 'ज्ञानेश्वरी' रूपात गीता सांगितली. त्यानंतर साधना देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन किर्ती श्रीरामे यांनी केले. प्रसंगी प्रा. सतिश शिनखेडे, खोब्रागडे गुरूजी, वामन भुसारी, प्रभाकर ताबाळी, यशवंतराव नानोटी, श्याम मोहता, निलिमा हर्षे, उर्मिला झुरमुरे आदी उपस्थित होते.

## RBS इथेनॉल प्लांटमध्ये...

(पान क्र. ९ वरून)

टेंडर पोहचले. अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश मिळाले.

उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, तहसिलदार सतिश मासाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी जाधव तसेच पोलीस निरिक्षक प्रमोद बानबले घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अधिनस्थ कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या.

## ब्रम्हपुरी भारतीय जनता पार्टीच्या...

(पान क्र. ९ वरून)

म्हणून आग्रही होते. अगदी नामांकन अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवसापर्यंत उमेदवार निश्चित आला नव्हता. याच दिवशी चिमूरचे आमदार बंटी भांगडीया यांनी सुमारे ११ वाजता अतुल देशकर यांची भेट घेतली. अखेर पर्यंत त्यांनी विलास विखार यांचे समर्थन केले. परंतु अतुल देशकर आपल्या भूमिकेपासून तसूभरही हटायला तयार नव्हते. शेवटी भांगडीया यांना माघार घ्यावी लागली, आणि अतुल देशकर यांच्या मर्जीतील निष्ठावंत कार्यकर्ता तथा शहर भाजपाचे अध्यक्ष यांचे नाव जवळपास दुपारी ०१ वाजता निश्चीत करण्यात आले. अत्यंत अशा नाट्यमय घडामोडीत प्रा. अतुल देशकर यांनी बाजी मारल्याचे स्पष्ट झाले.

**माजी आमदार देशकर समोर**

## नगर परिषद निवडणूकीत १०४...

(पान क्र. ९ वरून)

असे ११ प्रभागातील २३ नगरसेवक पदासाठी एकुण १०० वैध नामांकन घोषित करण्यात आले.

शहरातील प्रमुख पक्ष काँग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट, शिवसेना, शिवसेना (उबाठा), बहुजन समाज पार्टी, आम आदमी पार्टी, रिपब्लिकन पार्टी (खोरीपा) तसेच इतर लहान पक्ष आणि अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या संख्येने उमेदवारी दाखल केली आहे. नामांकन परत घेण्याची अंतिम तिथी २१ नोव्हेंबर आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट), बीएसपी, शिवसेना (उबाठा) आणि रिपब्लिकन गटांनीही निवडक प्रभागांमध्ये उमेदवार उभे करून आपले अस्तित्त्व सिद्ध केले आहे. ज्येष्ठ, महिला, युवा असे सर्वच समाजघटक या निवडणुकीबाबत उत्सुक असून शहरातील चौक-चौकात, बाजारपेठेत, नागरिकांमध्ये राजकीय चर्चा जोमात सुरू आहेत.

बहुपक्षीय लढतीमुळे मतांची विभागणी कोणत्या दिशेने होणार? आणि कोणता पक्ष मजबूत प्रचारयंत्रणा उभी करतो? यावर संपूर्ण लढत अवलंबून राहणार आहे. ब्रह्मपुरी नगरपरिषद निवडणूक २०२५ ही चुरशीची आणि महत्वाची ठरणार असल्याची चिन्हे आता अधिक ठळक होत आहेत. नामांकन परत घेण्याची अंतिम तिथी २१ नोव्हेंबर असून त्यानंतरच निवडणूकीचे खरे स्वरूप स्पष्ट होईल.

**आव्हान :**

माजी आमदार प्रा.अतुल देशकर यांनी आपल्या पसंतीच्या कार्यकर्त्याला नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देऊन बाजी मारली असली तरी त्या उमेदवाराला निवडून आणण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. प्रा. सुयोग बाळबुद्धे यांना काँग्रेसचे तगडे उमेदवार योगेश मिसार यांच्याशी झुंज द्यावी लागणार आहे. मिसार यांच्या पाठीशी ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे विद्यमान आमदार विजय वडेट्टीवार ठामपणे उभे आहेत. माजी आमदार प्रा. अतुल देशकर हे आमदार वडेट्टीवार यांचे आव्हान कसे पेलतात, ह्याविषयी मतदारामध्ये कमालीची उत्सुकता आहे.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404